# महाराष्ट्र शासन
## पशुसंवर्धन विभाग
## पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-४११ ०६७.
## सरळसेवेने भरावयाच्या पदांची जाहिरात
**वेबसाईट https://ahd.maharashtra.gov.in**

जाहिरात क्रमांक :-एनजीओ-५/भरती-२०२२/(प्र.क्र.१२०५)/ /२०२२, पसं-१, पुणे-६७, दिनांक : / /२०२३

शासन निर्णय, वित्त विभाग पदनि-२०२२/प्र.क्र.२/२०२२/आपुक, दि. ३१/१०, २०२२ अन्वये वित्त विभागाने पदभरतीवरील निर्बंध शिथिल केलेले आहेत. यानुसार पद पदभरतीला मान्यता देताना ज्या विभाग/कार्यालयाचा आकृतिबंध अद्याप अंतिम झालेला नाही अशा विभागातील (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र.१३६/का.१३-अ मुंबई, दिनांक २१.११.२०२२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार पशुसंवर्धन विभागाकडील राज्यस्तरीय गट-क सरळसेवा संवर्गातील विविध संवर्गाची पदे भरण्यासाठी खाली नमूद केलेल्या संवर्ग निहाय रिक्त पदाकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा https://www.ahd.maharashtra.gov.in या

**-: अर्जाचे वेळापत्रक :-**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याची सुरुवात | दिनांक २७.०५.२०२३ (सकाळी १०.०० पासून) |
| २ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ११.०६.२०२३ (रात्री ११.५९ पर्यंत) |
| ३ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | https://www.ahd.maharashtra.gov.in वर स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल. |

(**टीप** :- वरील तारखांमध्ये बदल होण्याची संभावना/शक्यता आहे)

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | पशुधन पर्यवेक्षक | ३७६ |
| २ | वरिष्ठ लिपीक | ४४ |
| ३ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | २ |
| ४ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | १३ |
| ५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ४ |
| ६ | विविध संवर्ग पदे | ७ |
| | तारतंत्री-३, यांत्रिकी-२, बाष्पक परिचर -२, | |

- सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील जाहिरात पशुसंवर्धन विभागाच्या https://ahd.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून सदर जाहिरातीमध्ये अर्ज कसा भरावा, परीक्षेचे स्वरूप, परीक्षेचा अभ्यासक्रम इत्यादीबाबत सविस्तर माहिती दिलेली आहे. उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरिता केवळ उक्त संकेतस्थळावरून विहित ऑनलाईन पद्धतीने भरलेले अर्ज व परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येईल. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.
- **शुल्क :-**

  अमागास :- १०००/-

  मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ/दिव्यांग/माजीसैनिक :- ९००/- (१० टक्के सूट)

  उपरोक्त परीक्षा शुल्का व्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच देय कर अतिरिक्त असतील.

  परीक्षा शुल्क ना-परतावा (Non Refundable) आहे.
- स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७ यांना राहतील. तसेच उपरोक्त एकूण पदे दि. १५.०८.२०२३ पर्यंत भरावयाची असून संदर्भीत पात्र उमेदवारांची निवड यादी जाहीर झाल्यानंतर उमेदवारांना उपलब्ध होणाऱ्या पदांवर गुणानुक्रमानुसार प्रथम नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यास आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७ हे सक्षम राहतील. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. तसेच दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याचा राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा शासन विहित नियमानुसार विचार केला जाईल.

**पुणे - ४११ ०६७**
**दिनांक : २४.५.२०२३**

**आयुक्त पशुसंवर्धन**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-६७**

**DGRPR-2023-24/क्र-5/C 951**